# <u>कोटेशन सूचना</u>

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**
**पो. शिर्डी-४२३१०९ ता. राहाता जि. अहिल्यानगर**
**फोन नं.०२४२३-२५८५००**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील श्रीसाई प्रसादालय व लाडू-बर्फी निर्मिती विभागाचे रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठया तोंडाचे चांगले डबे साहीत्य विक्रीकामी विविध ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

---

**विषय- रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठया तोंडाचे चांगले डबे खरेदीचे दरपत्रक.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्रीसाई प्रसादालय व लाडू-बर्फी निर्मिती विभागाचे रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठया तोंडाचे चांगले डबे साहीत्य खरेदी करणेकामी विविध ठेकेदार यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ. नं.** | **साहीत्याचा तपशिल** | **दर प्रती नग रुपये पैसे (सर्व करांसह)** | |
|---|---|---|---|
| ०१. | रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठया तोंडाचे चांगले डबे | | |

अटी व शर्ती:-

०१) सदर खरेदीचे दर GST सह द्यावे.
०२) उच्चत्तम मंजुर दरधारकास कार्यादेश दिल्यानंतर १५ दिवसांचे आत सदर साहित्य उचलणे बंधनकारक राहील.
०३) आपणांस उपलब्ध मालाची संपूर्ण रक्कम नियमानुसार दु.०४.०० वाजेच्या आत लेखाशाखेत रोखीने जमा करावी लागेल व पावती घेऊन अभिलेख कक्ष विभागाचे कर्मचा-यास प्रत्यक्ष दाखवून स्वखर्चाने साहित्य उचलता येईल. दु.०४.०० वाजेनंतर कोणत्याही परिस्थितीत मालाची डिलिव्हरी दिली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
०४) कोणतेही अगर सर्व दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.
०५) सदरचे काम करतांना सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून काम करण्यात यावे. तसेच सदरचे काम करतांना कोणतीही घटना घडल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही. सदरच्या घटनेची जबाबदारी स्वत: आपणावर राहील.

आपले दरपत्रक उपरोक्तप्रमाणे स्वत:चे फर्मचे लेटरहेडवर मोहोरबंद पाकीटात, **<u>“अभिलेख कक्ष विभाग- रिकामे तेला-तुपाचे लहान/मोठया तोंडाचे चांगले डबे खरेदीचे दरपत्रक”</u>** असे पाकीटावर स्पष्ट नमूद करुन दरपत्रक, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नांवे दिनांक २५/०२/२०२६ पर्यंत वरील अटी व शर्तीस अधिन राहून तातडीने पाठविण्याचे करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(भिमराज दराडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी